**विषय नं. ६ : न्यासाची योजना दुरूस्ती बाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

ठराव नं. ६ : न्यासाच्या प्रभावी व उचित व्यवस्थापने करिता चौकशी अर्ज नं.४१/१९७२ अन्वये सन १९७२ साली योजना मंजुर झाली, त्या मध्ये चौकशी अज्र नं. २०६/१९७५ अन्वये दिनांक १६/०८/१९७९ रोजी योजना दुरूस्ती झाली तद्नंतर योजनेमध्ये काही बाबीच्या तरतुदी नसल्यामुळे पुन्हा चौकशी अर्ज नं. २११०/२००७ अन्वये दिनांक १६/१०/२००७ रोजी पुन्हा योजनेमध्ये दुस-यांदा दुरूस्ती झाली, त्याप्रमाणे सध्या न्यासाचे कामकाज सुरू आहे.

योजनेमध्ये दुस-यांदा दुरूस्ती होवून सुमारे १७ वर्षे झाली आहेत. या वर्षाचे कालावधी मध्ये देवस्थानच्या भक्तांमध्ये विशेषत: कर्नाटक राज्या मधून येणारे भक्तांमध्ये लक्ष्यणीय वाढ झाली आहे. त्यामुळे चालू कालमान व परिस्थितीनुसार न्यासाचे व्यवस्थापन प्रभावी व उचित होणे संदर्भात विश्वस्त मंडळाची संख्या वाढविणेबाबत तसेच विश्वस्त होणेचे निकष व पात्रता यामध्ये बदल करण्याचे अनुषंगाने तसेच काही कालबाहय तरतुदी रद्द करणेबाबत तसेच विश्वस्त मंडळ सभा बाबत वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत काही बदल व दुरूस्त्या करणे संदर्भात आजच्या सभेत सविस्तर चर्चा झाली, योजनेतील पॅरा कलम ३३ अन्वये योजनेतील दुरूस्ती मे. धर्मादाय आयुक्तांकडून करून घेण्याचे अधिकार विश्वस्तांना आहेत असे नमूद आहे.सदर योजनेतील बदल व दुरूस्त्या बाबत खालीलप्रमणे चर्चा झाली.

१. योजनेतील पॅरा कलम ६ व ९ मधील तरतुदीनुसार विश्वस्त मंडळाची एकूण सदस्य संख्या ७ असून त्यापैकी पुजारी वर्गातील २ व सर्वसाधारण भक्त वर्गातील ५ विश्वस्तांची तरतुद आहे. वर चर्चा केल्याप्रमाणे कर्नाटक राज्यामधील भक्तांमध्ये लक्षणीय वाढ झालेने देवस्थानचे व्यवस्थापन व नियंत्रण, देवस्थानची वाढ व विकासाकरीता सर्वसधारण भक्त वर्गातील विश्वस्तांची संख्या वाढविणे गरजेचे असून सर्वसाधारण वर्गातील ५ विश्वस्तां ऐवजी त्यामध्ये वाढ करून विश्वस्त संख्या ९ करण्यात यावी व पुजारी गटातील २ विश्वस्त असे एकूण विश्वस्तांची संख्या ११ करण्यात यावी व याच अनुषंगाने व प्रमाणाने योजनेतील पॅरा कलम ६, ९ व १४ मध्ये नमूद विश्वस्त मंडळ संख्येच्या आकडेवारीच्या तरतुदी मध्ये बदल करण्यात यावेत.

२. योजनेतील पान नं. ३ पॅरा कलम ७ मध्ये ''पहिले ट्रस्टी'' या सदरांखाली नमूद तरतुदी कालबाहय झाले असून त्यातील पॅरा कलम ७(अ) ते ७(ड) इथपर्यंतचा मजकूर रद्द करून त्याऐवजी पॅरा कलम ७ म्हणून ''विश्वस्त मंडळाची रचना व कालावधी'' या सदराखाली खाली नमूद नविन मजकूर समाविष्ट करणे गरजेचे आहे.

विश्वस्त मंडळाची रचना व कालवधी :-

१. न्यासाची एकूण विश्वस्त मंडळाची संख्या ११ असून त्यापैकी पुजारी सभासदांमधून २ विश्वस्त व सर्वसाधारण भक्त सभासदां मधून ९ विश्वस्तांची निवड केली जाईल.

२. विश्वस्त मंडळामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष व खजिनदार अशी तीन पदे राहतील. निवडून आलेल्या विश्वस्तांनी आपल्या पहिल्या सभेमध्ये सदर पदांची निवड करावयाची आहे.

श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट ★ P.T.R.No. S.S.A.15/ 13-10-1952 ★ गुड्डापूर, ता.जत, जि.सांगली

३. न्यासाचे दैनंदिन कामकाजाकरीता, इतिवृतांत लिहणे करीता, पत्रव्यवहार करणे करीता व तद्अनुषंगिक कामे करणे करीता पगारी सेक्रेटरीची नियुक्ती विश्वस्त मंडळाकडून केली जाईल.

४. विश्वस्त मंडळाचा व पदाधिका-यांचा कालावधी ५ वर्षांचा राहील. ५ वर्षानंतर योजनेतील तरतुदीप्रमाणे पुढील कालावधी करीता विश्वस्त मंडळ व पदाधिका-यांची निवड केली जाईल.

५. मुदतपुर्व एखादया विश्वस्ताचे अगर पदाधिका-याचे पद मृत्यू, राजीनामा अगर काही कारणांने रिक्त झालेस उर्वरित विश्वस्तांनी विश्वस्त मंडळाच्या उर्वरित कालावधीकरीता बहुमताने अशी रिक्त जागा भरणेची आहे.

३. योजनेतील पान नं. ४ पॅरा ७ (ई) मध्ये विश्वस्तांची अपात्रता नमूद केली आहे. सदरची संपूर्ण तरतूद रद्द करून त्याऐवजी खालील नविन तरतुद नमूद करणे आवश्यक आहे.

**विश्वस्तांची अपात्रता :-** खालील कारणांमुळे न्यासाचे विश्वस्त अपात्र होतील.

१. मृत्यू पावल्यास,

२. राजीनामा दिल्यास व मंजूर झाल्यास,

३. एखादया विश्वस्ताने अथवा पदाधिका-याने न्यासाच्या हिताच्या व उद्दीष्टांचे विरूध्द वर्तन केल्यास त्यास बाजू मांडण्याची संधी देवून त्याची बाजू असमाधानकारक वाटल्यास विश्वस्तांनी त्यांचे विश्वस्त पद रद्द केल्यास,

४. प्रचलित कायदयान्वये एखादया विश्वस्ताच्या विरूध्द दोष सिध्द होवून शिक्षा झाल्यास,

५. एखादा विश्वस्त अंमली पदार्थाचे सेवन करून, नशापान करून, देवस्थान किंवा देवस्थान आवारात आल्यास,

६. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३६(अ) मध्ये नमूद कारणाने,

७. विश्वस्त मंडळाचे सलम ३ सभेस एखादा विश्वस्त विनापरवानगी गैरहजर राहील्यास,

४. योजनेतील पान नं. ४ पॅरा कलम ८ ब/१ मधील वरून चौथी ओळ -- न्यासाचे सभासदत्व मिळविण्यासाठी या मजकूरानंतर, ''कोणत्याही २ विश्वस्तांचे शिफारशीने'' हा मजकूर नमूद करणे आवश्यक आहे. त्यानंतर पॅरा कलम ८ ब/२ मधील मजकूर, ''त्या अर्जावर न्यासाचे सभासद असलेल्या कोणत्याही दोन सभासदांचे अनुमोदन आवश्यक राहील.'' हे वाक्य रद्द करून त्याऐवजी ''त्या अर्जावर न्यासाचे कोणत्याही दोन विश्वस्तांची शिफारस आवश्यक राहील.'' अशी दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

५. योजनेतील पान नं. ६, पॅरा कलम ९ ''विश्वस्त मंडळाच्या निवडीची प्रक्रीया'' या सदरांखालील ९अ मधील मजकूर, ''७ विश्वस्त'' ऐवजी ''११ विश्वस्त'' तसेच ''५ विश्वस्त'' ऐवजी ''९ विश्वस्त'' अशी दुरूस्ती करून पॅरा कलम ९क मधील मजकूर -- ''व तो सलग ५ वर्षाचा न्यासाचा सभासद असला पाहिजे.'' ही तरतुद रद्द करून वगळण्यात यावी. तसेच पॅरा कलम ९ड (२) मध्ये नमूद ५

P.T.R.No. S.S.A.15/ 13-10-1952

ऐवजी ९ व ७ ऐवजी ११ अशी दुरूस्ती तसेच पॅरा कलम ९ड (३) मध्ये देखील "५" ऐवजी "९" अशी दुरूस्ती तसेच पॅरा कलम ९फ मधील वरून ७व्या ओळीवरील "५ जागेसाठी" ऐवजी "९जागेसाठी" तसेच त्यातीलच खालून दुसरी ओळ व चौथ्या ओळीमध्ये देखील "५" ऐवजी "९" अशी दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

तसेच पॅरा कलम ९फ मध्ये नमूद मजकूराच्या वरून ९ व्या ओळीनंतर, "विश्वस्त पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवाराने श्री धानम्मा देवी देवस्थान ट्रस्ट कडून व ट्रस्ट संचलित कोणत्याही शाखेकडून त्याची अथवा त्याच्या कुटूंबातील सदस्यांकडून कोणत्याही प्रकारचे येणेबाकी नसलेबाबतचा दाखला अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांचा उमेदवारी अर्ज अपात्र होईल." अशी दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

६. योजनेतील पान नं. ८ पॅरा कलम १०ब मधील संपूर्ण तरतूद रद्द करून वगळण्यात यावी. कारण याबाबतची तरतुद वरील पॅरा नं. २ मध्ये केलेली आहे.

७. योजनेतील पान नं. ९ पॅरा नं. ११ मधील संपूर्ण तरतूद रद्द करून त्याऐवजी खालीलप्रमाणे नविन तरतुद करणे आवश्यक आहे.

पदाधिकारी व त्यांची कामे :-

अ) अध्यक्ष :-

१. सर्व सभांचे अध्यक्षस्थान स्विकारून नि:पक्षपातीपणे सभा पार पाडणे.
२. विश्वस्त मंडळाशी चर्चा करून सभेची तारीख, ठिकाण व वेळ निश्चित करणे.
३. कर्मचा-यांचे मदतीने स्वत:चे सहीने सर्व सभांच्या नोटीस काढणे.
४. न्यासाचे वतीने प्रमुख प्रतिनिधी म्हणून नि:स्वार्थीपणे कार्य करणे.
५. न्यासाचे दैनंदिन व्यवहार, कारभार, व्यवस्थापन तद्अनुषंगिक बाबींवर देखरेख व नियंत्रण करणे.
६. विश्वस्तांच्या व इतर पदाधिका-यांच्या विचार विनिमयाने न्यासाचे ध्येय धोरण ठरविणे व त्याचे पूर्ती करीता योजना आखणे.
७. संयुक्त सहीने आर्थिक व्यवहार पाहणे.
८. न्यासाचे उद्दीष्ट पुर्ती करीता व प्रभावी व्यवस्थापनेकरीता वेळोवेळी न्यासाचे अन्य पदाधिकारी, विश्वस्त व कर्मचा-यांना सुचना देणे व मार्गदर्शन करणे.
९. सभेमध्ये झालेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही व अंमलबजावणी करणे अथवा संबंधीतांकडून करवून घेणे.
१०. न्यासाचे वतीने न्यास हितासाठी आवश्यक असणारी सर्व कायदेशिर कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडणे.
११. न्यासाच्या कोणत्याही सभेमध्ये एखादया निर्णयाबाबत सम-समान मते झाल्यास निर्णायक मत/कास्टींग वोट देणे.

श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट P.T.R.No. S.S.A.15/ 13-10-1952 गुड्डापूर ता.जत जि.सांगली

ब) **उपाध्यक्ष :-**

१. अध्यक्षांचे गैरहजेरीत त्यांची कामे पाहणे, तथापि, आर्थिक व्यवहारांसंबधी ठरावाद्वारे सहीचे अधिकार वापरण्यात येतील.

२. न्यासाचे हिताचे दृष्टीने नि:स्वार्थीपणे न्यासाचे प्रतिनिधीत्व करणे व अध्यक्षांना त्यांचे कार्यामध्ये मदत करणे.

३. न्यासाचे दैनंदिन कारभारांमध्ये देखरेख व नियंत्रण ठेवणे व कर्मचा-यांकडून कामे करून घेणे.

४. ठरावात ठरलेप्रमाणे कार्यवाही व अंमलबजावणी करणे.

५. हिशोबां संदर्भात संबंधीतांना वेळोवेळी सुचना देणे.

६. ठरावाद्वारे सोपविलेले कार्य करणे.

क) **खजिनदार :-**

१. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे सुचनेप्रमाणे कायदेशिरपणे आर्थिक व्यवहार पाहणे.

२. जमा खर्चाबाबत व हिशोबांसंबंधीत नेमलेल्या नोकर वर्गाकडून कामे करून घेणे.

३. नोकर वर्गाचे वतीने दैनंदिन जमा खर्च व हिशोब नोकर वर्गाकडून वेळच्या वेळी पूर्ण करून घेणे.

४. खर्चाची मान्य बिले व देयके अध्यक्षांच्या व विश्वस्त मंडळाच्या मान्यते नंतर अदा करणे.

५. दर वर्षी ३१ मार्च नंतर झालेल्या हिशोबांची संबंधीत कर्मचा-यांमार्फत हिशोब पत्रके पूर्ण करून त्याचे लेखापरिक्षण करून घेणे व मंजूरीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे व त्यानंतर विहित कालावधीत मे. सहा. धर्मादाय आयुक्तसो, यांचे कार्यालयात सादर करणे.

६. वार्षिक अंदाजपत्रक तयार करून सभेच्या मंजूरीनंतर मे. सहा. धर्मादाय आयुक्तसो, यांचे कार्यालयात सादर करणे.

७. दैनंदिन जमा होणारी रक्कम त्या दिवशी बँकेत भरणा करणे शक्य नसल्यास दुस-या दिवशी खर्चासाठी आवश्यक रक्कम ठेवून उर्वरीत रक्कम बँकेत भरणा करणेत यावी याबाबत कॅशिअर यांचेवर वेळोवेळी देखरेख व नियंत्रण करणे.

८. योजनेतील पान नं. ९ पॅरा कलम १२ - ''सभा'' या सदरांखालील संपूर्ण मजकूर व तरतुद रद्द करून त्याऐवजी खालील नविन मजकूर नमूद करणे आवश्यक आहे.

अ) **विश्वस्त मंडळ सभा :-**

१. अध्यक्षांचे सहीने विश्वस्त मंडळ सभेची नोटीस काढणेत येईल. त्यामध्ये सभेची वेळ, दिनांक, ठिकाण व विषय नमूद करण्यात येईल.

२. सभेपूर्वी ७ दिवसांची नोटीस काढून ती विश्वस्तांना सभेपूर्वी समक्ष हस्तदेय किंवा रजिस्टर ए.डी.ने किंवा स्पीड पोस्टने किंवा इलेक्ट्रॉनिक मिडीया सर्व्हीसेस द्वारे म्हणजेच ई-मेल, व्हॉट्सॲप अथवा अन्य कायदेशिर मार्गाने पाठविण्यात येईल. तथापि, संबंधीत यंत्रणेच्या तांत्रिक दिरंगाईमुळे एखादया विश्वस्तांस वेळेत नोटीस मिळाली नसल्यास होणारे सभेवर त्याचा परिणाम होणार नाही. तसेच झालेले ठराव कायदेशिर राहतील.

P.T.R.No. S.S.A.15/ 13-10-1952

३. किमान महिन्यातून एक वेळा विश्वस्तांची सभा बोलाविली जाईल. आवश्यकतेनुसार जादा सभा घेण्यात येतील, काही तातडीच्या कामानिमित्त सभेपूर्वी केवळ ३ दिवसांची नोटीस देवून सभा घेण्यात येईल, त्यास तातडीची सभा असे संबोधले जाईल.

४. विश्वस्त मंडळाच्या सभेचा कोरम ११ विश्वस्तांपैकी ६ विश्वस्तांचा राहील. काही कारणांने विश्वस्तांची एकूण संख्या कमी झाल्यास याच प्रमाणात म्हणजेच निम्मे अधिक एक कोरम राहील. सभेचा कोरम पूर्ण न झाल्यास अर्धा तासाकरीता सभा तहकूब केली जाईल. तद्नंतर होणारे सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.

५. किमान ३ विश्वस्तांनी विश्वस्त मंडळ सभा बोलाविणेबाबत अध्यक्षांकडे मागणी केल्यास ७ दिवसांचे आत अध्यक्षांनी विश्वस्त मंडळाची सभा बोलवावी, किंवा अशीं सभा बोलविण्यास काही अडचण असल्यास मागणी करणारे विश्वस्तांना कळविण्यात यावे, अन्यथा मागणी करणारे विश्वस्त अशी सभा त्यांचे सहीने नोटीस काढून न्यासाचे कार्यालयात सभा घेतील व ते कायदेशीर असेल, अशी सभा न्यासाचे कार्यालया व्यतिरिक्त अन्य ठिकाणी घेता येणार नाही.

६. सभेस अध्यक्ष व उपाध्यक्ष गैरहजर असल्यास उपस्थित विश्वस्तांमधून सभा अध्यक्षांची निवड करून सभा घेण्यात येईल.

७. सभेचा सभा इतिवृतांत हस्तलिखीत किंवा संगणकावर टाईप करून प्रिंट काढून ठेवण्यात येईल.

**ब) वार्षिक सर्वसधारण सभा :-**

१. आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्याचे आत अशी सभा बोलवावी, काही कारणास्तव या मुदतीत सभा घेता आली नाही तर, त्याचे कारण नमूद करून वार्षिक सभेचे आयोजन करण्यात यावे.

२. सभेची नोटीस अध्यक्षांचे सहीने, त्यांचे गैरहजेरीत उपाध्यक्षांचे सहीने अथवा दोघेही काही तांत्रिक वा नैसर्गिक कारणांने गैरहजर असल्यास विश्वस्त मंडळानी ठरविलेल्या विश्वस्ताचे सहीने काढण्यात येईल, अशा नोटीसीमध्ये सभेची दिनांक, ठिकाण व वेळ तसेच विषय नमूद करणे बंधनकारक राहील.

३. सभेची नोटीस सभेपूर्वी १५ दिवस अगोदर कन्नड व मराठी भाषेमध्ये काढण्यात येईल. न्यासाची सभासद संख्या जास्त असल्याने सदरची नोटीस महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील जास्त खपाचे दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेत येईल, तसेच सदर नोटीस देवस्थान न्यासाच्या नोटीस बोर्डवर पाच पंचासमक्ष ढकवून प्रसिध्द करावी, तसेच देवस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात यावी.

४. सभेचे अध्यक्ष पद, न्यासाचे अध्यक्ष यांनी व त्यांचे गैरहजेरीत उपाध्यक्ष अथवा उभयतांचे गैरहजेरीत उपस्थित सभासदांनी निवडलेली व्यक्ती सभेचे अध्यक्ष पद धारण करील व नि:पक्षपातीपणे सभा पार पाडेल.

श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट गुड्डापूर ता. जत, जि. सांगली
P.T.R.No. S.S.A.15/ 13-10-1952

५. सभेचा कोरम एकूण सभासद संख्येच्या ४० टक्के राहील. कोरम पूर्ण न झाल्यास एक तासाकरीता सभा तहकूब केली जाईल.त्यानंतर त्याच ठिकाणी सभा होईल. मात्र त्यास कोरमची आवश्यकता असणार नाही. त्यात झालेले ठराव कायदेशिर असतील.

६. वार्षिक सर्वसधारण सभेत मागील सभा वृतांत वाचून कायम करणे, देवस्थान न्यासाचे विकासासाठी धोरणांत्मक विषयांवर चर्चा करणे, विश्वस्त मंडळाने सादर केलेल्या अहवालावर निर्णय घेणे, वार्षिक हिशोब पत्रके व अंदाजपत्रके यावर चर्चा करून निर्णय घेणे. तसेच लेखापरिक्षकांची नेमणूक करणे, तसेच विश्वस्त मंडळाने सादर केलेल्या शिफारशीवर व सभासदांनी सादर केलेल्या सूचना व अर्जावर चर्चा करून निर्णय घेणे इत्यादी बाबींवर चर्चा करून निर्णय घेण्यात येतील.

९. योजनेतील पान नं. १० पॅरा १३ व १४ मधील संपूर्ण मजकूर रद्द करून त्याऐवजी खालील नविन मजकूर नमूद करणे आवश्यक आहे.

**विशेष सर्वसाधारण सभा**

विश्वस्त मंडळास एखादी विशेष बाब सभादांसमोर ठेवून चर्चा करून निर्णय घ्यावयाचे झाल्यास विशेष सर्वसधारण सभा बोलविण्यात येईल. त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेचे नियम पाळले जातील. सदर सभेत केवळ विषय पत्रिके वरील विषयांवरच चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, तसेच एकूण सभासद संख्येच्या २५ टक्के सभासदांनी एखादे विषयांवर विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याची मागणी केल्यास अध्यक्षांनी अशी सभा एक महिन्याच्या आत बोलवावी, अन्यथा मागणी करणार सभासदांपैकी किमान दोघांचे सहीने वार्षिक सर्वसाधारण सहीचे नोटीसीचे नियमांचे पालन करून सभा बोलविली जाईल.

१०. योजनेतील पान नं. ११ पॅरा १७ ''सभा वृतांत'' सदरांमधील तरतूद रद्द करून त्याऐवजी खाली नमूद नविन मजकूर समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

''न्यासाच्या सर्व प्रकारच्या सभांचे वृतांत मराठी भाषेमध्ये हस्तलिखीत किंवा संगणकावर टाईप करून ठेवण्यात येतील. मागील सभेचा वृतांत पुढील सभेत वाचून तो कायम अथवा अस्विकारलेबाबत शेरा नमूद करण्यात येईल व त्यावर अध्यक्षांची सही घेण्यात येईल.''

११. योजनेतील पान नं. १४ पॅरा कलम २६ ''दुरूस्ती'' या सदरांमधील ''डागडूजी खर्च ५००० ऐवजी १लाख रूपये करण्यात यावे.''

१२. योजनेतील पान नं. १५ वरील पॅरा कलम २७(क) मधील मजकूर, ''अध्यक्ष व इतर ट्रस्टी पैकी १'' याऐवजी ''अध्यक्ष व खजिनदार यांचे संयुक्त सहीने चालविण्यात यावे, तसेच यामध्ये परिस्थितीनुसार वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास राहील.'' अशी तरतूद नमूद करणे आवश्यक आहे.

१३. योजनेतील पान नं. १५ पॅरा कलम २९ -- नोकर वर्ग या सदरांखालील तरतूद रद्द करून त्याऐवजी खालील नविन मजकूर नमूद करण्यात यावे.

श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट P.T.R.No. S.S.A.16/ 13-10-1952 गुड्डापूर.ता.जत.जि.सांगली

१. देवस्थानचे कार्य उचित व प्रभावी होण्यासाठी सेक्रेटरी, कायदेशिर सल्लागार, इंजिनिअर, मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अधिकारी, व्यवस्थापक, कॅशिअर, अकौंटंट, कॉम्प्युटर ऑपरेटर, सेल्समन, स्टोअर किपर, क्लार्क, शिपाई, सुरक्षा कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी इत्यादी तसेच विश्वस्त मंडळाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार ठरविल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचा-यांची नेमणूक करण्यात येईल.

२. वरील प्रकारे नेमावयाचे अधिकारी, कर्मचारी यांची नेमणूक विश्वस्त मंडळाकडून जाहीरातीद्वारे अगर बिगर जाहीरातीद्वारे करण्यात येईल. त्यांचे पगार, मानधन, भत्ता, फंड, ग्रॅज्युइटी इत्यादी ठरविणे अगर त्यांना कामावरून कमी करणे, शिस्त भंगाची कारवाई करणे, दंड करणे इत्यादी अधिकार विश्वस्त मंडळास राहतील.

३. अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या सेवा शर्तीचे नियम व नियमांवली विश्वस्त मंडळाने तयार करणेचे आहेत व सदरचे नियम त्यांचेवर लागू व बंधनकारक असतील.

१४. योजनेतील पान नं. १६, पॅरा कलम ३२ "नियमांवलीतील बदल" या शिर्षकांसह त्यातील संपूर्ण मजकूर रद्द करून त्याऐवजी खालील नविन मजकूर नमूद करणे आवश्यक आहे.

**योजनेतील बदल व दुरूस्ती बाबत :-**

प्रस्तुत योजनेमधील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल अथवा दुरूस्ती करावयाची असल्यास प्रथम विश्वस्त मंडळ सभेमध्ये त्याबाबत चर्चा करून त्याबाबतचा मसुदा अंतिम मंजुरीसाठी न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभा किंवा विशेष सर्वसाधारण सभा बोलावून त्या सभेसमोर ठेवून मंजूरी घेण्यात यावी व अशा सभेमध्ये मंजूरी मिळालेल्या योजनेतील बदल किंवा दुरूस्तीचा अहवाल महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार मा. उप/सहा.धर्मादाय आयुक्तसो, सांगली यांचे कार्यालयास सादर करण्यात यावा.

वरीलप्रमाणे चालू कालमान व परिस्थितीनुसार न्यासाच्या प्रस्तुत योजनेमध्ये बदल व दुरूस्ती होणे आवश्यक असल्याबाबत सर्वांनी मत मांडले व योजनेतील पॅरा कलम ३३ मधील तरतुदीप्रमाणे योजना दुरूस्ती करण्याचा अधिकार विश्वस्तांना असल्याचे नमूद केले आहे. तथापि, योजना दुरूस्ती ही धोरणांत्मक बदल व निर्णय असल्याने योजना दुरूस्तीचा विषय सर्व सभासदांसमोर ठेवून त्यास अंतिम मंजूरी घेणे गरजेचे असल्याबाबत सर्वांचे एकमत झाले. सबब, योजना दुरूस्ती करीता न्यासाच्या सर्व सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा बोलावून त्यामध्ये नियोजित योजना दुरूस्तीस मंजूरी घेण्यात यावे असे ठरले. त्यास या सभेने बहुमताने मंजूरी दिली.

सुचक : श्री सदाशिव षण्मुखप्पा गुड्डोडगी
अनुमोदक : श्री चंद्रशेखर रेवाप्पा गोब्बी
ठराव सर्वानुमते मंजूर

श्री दानम्मादेवी देवस्थान ट्रस्ट गुड्डापूर ता. जत, जि. सांगली P.T.R.NO. S.S.A.15/ 13-10-1952